# Heart Disease हृदयविकाराचा धोका वाढतोय

पुणे - आनुवंशिक चाचणी केलेल्यांपैकी २४ टक्के व्यक्तींना हृदयरोगाचा (कोरोनरी आर्टरी डीसीज-सीएडी) उच्च धोका आहे. २९.५ टक्के जणांना आनुवांशिकतेमुळे शरीरासाठी वाईट असणाऱ्या कोलेस्टेरॉलचे प्रमाण वाढल्याने हृदयरोगाचे प्रमाण वाढत असल्याचा निष्कर्ष अभ्यासातून निघाला आहे. जागतिक ‘डीएनए’ दिन मंगळवारी होता. त्यानिमित्ताने इंडस हेल्थ प्लसने आनुवंशिक चाचणीवर आधारित केलेल्या अभ्यासाची माहिती दिली. त्यातून हा निष्कर्ष निघाला.